रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

रविवार, दि. २७ फेब्रुवारी, २०२२

# मराठी विभाग

## मराठी भाषा गौरव दिन सोहळा

## माउली सार्वजनिक वाचनालय, बलवडी

### अहवाल

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून रविवार, दि. २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजता बलवडी (भा.) येथे माउली वाचनालयाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त डॉ. तेजस चव्हाण (मराठी विभाग, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ''मराठी ही आपली मातृभाषा आहे. दुसऱ्या भाषेला दुय्यम स्थान देऊन मराठी भाषा मोठी होणार नाही. मराठी भाषा ही खऱ्या अर्थाने अशिक्षित, गावगाड्यातील शेतकरी, शेतमजूर, अठरा पगड जातीधर्मातील लोकांनी जतन केली आहे.'' असे मत यावेळी डॉ. तेजस चव्हाण यांनी मानले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. तेजस चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. संजय पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सुरेश चव्हाण, सयाजी जाधव, संतोष जाधव, शामराव पवार, चंद्रकांत पवार, अमोल दुपटे, अनिल दुपटे, दीपक सुर्यवंशी, अमर सय्यद, विकास चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. शांतिनाथ मांगले यांनी परिचय करून दिला तर प्रदिप पवार यांनी सूत्रसंचालन केले.

**निष्पत्ती :** बलवडी गावातील लोकांना मराठी भाषेचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** 42





विभागप्रमुख
**मराठी विभाग प्रमुख,**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDALAYA RAMANANDNAGAR (BURLI)

प्राचार्य
**प्राचार्य,**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.